# जाहिरनामा

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.63/97/ 16ब, दि.18/10/1997 व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.केओटी/3906/1437/ प्र.क्र.220/ई-10 दि.9/9/2009, तसेच शासन निर्णय क्र.केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दि.5/9/2013 मा.आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक मागासवर्ग यांचेकडील पत्र क्र. मावक/कार्या-18/कावि-4/एसआर/11/2018 दिनांक08/01/2018 मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडील आदेश क्र.कुका/337 दि.16/3/2018 व या कार्यालयातील सर्वसाधारण आरक्षण सोडत दि.15/3/2018 व महिला आरक्षण सोडत दि.15/3/2018 चे इतिवृत्त.

---

तमाम लोकांना या जाहीर निवेदनाद्वारे कळविणेत येते की, धुळे तालुक्यातील खालील सजांचे कोतवाल पद रिक्त असल्याने त्या रिक्त पदावर नविन कोतवाल भ्रती करणेत येणार आहे. यासाठी रिक्त सजांची आणि या सजांतील पद कोणत्या संवर्गासाठी आरक्षित करणेत आलेल आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**धुळे तालुका कोतवाल संवर्ग सरळसेवा भरती 2018 आरक्षणा बाबतची माहिती.**

| अक्रं. | कोतवाल पद भरण्या येणाया - सजेचे नाव | जातीचा प्रवर्ग व समांतर आरक्षण | अ.क्रं | कोतवाल पद भरण्या येणा-या सजेचे नाव | जातीचा प्रवर्ग व समांतर आरक्षण | अ.क्रं | कोतवाल पद भरण्या येणा-या सजेचे नाव | जातीचा प्रवर्ग व समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | १ | २ | ३ | १ | २ | ३ |
| १ | महिंदळे | खुला | ११ | रामी | भ.ज.ब (महिला) | २१ | जुनवणे | इ.मा.व |
| २ | देवपूर | खुला | १२ | नंदाणे | खुला | २२ | नंदाळे बु. | इ.मा.व. (महिला) |
| ३ | अवधान | खुला | १३ | सोनगीर | इ.मा.व | २३ | सडगाव | खुला (महिला) |
| ४ | वार | खुला | १४ | जापी | खुला (महिला) | २४ | आर्वी | खुला |
| ५ | खेडे | भ.ज.ड | १५ | नगाव | खुला | २५ | धाडरी | खुला |
| ६ | अकलाड | इ.मा.व. | १६ | फागणे | इ.मा.व | २६ | हेंद्रुण | खुला(सदर सजेचे कोतवाल हे दि.३०/०४/२०१८ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सदरचे भविष्यात रिक्त होणारे पद खुला आरक्षणात भरण्यात येत आहे.) |
| ७ | उभंड | खुला | १७ | बाळापुर | खुला (महिला) | २७ | कुंडाणे (वार) | खुला(सदर सजेचे कोतवाल हे दि.31/05/2018 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सदरचे भविष्यात रिक्त होणारे पद खुला आरक्षणात भरण्यात येत आहे.) |
| ८ | मरायवट. | इ.मा.व | १८ | वेल्हाणे | वि.जा.अ. | एकुण पदे | | २७ |
| ९ | देऊर बु. | खुला (महिला) | १९ | विंचूर | इ.मा.व. (महिला) | | | |
| १० | लामकानी | इ.मा.व | २० | धामणगाव | इ.मा.व. (महिला) | | | |

वरीलप्रमाणे नमुद करणेत आलेल्या सजांतील रिक्त कोतवालांच्या पदाची भरती करावयाची असुन, पात्र उमेदवारांने तहसिल कार्यालय धुळे येथे दि.10/04/2018 ते 24/4/2018पर्यंत शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत अर्ज समक्ष सादर करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांबाबत कोणताही विचार केला जाणार नाही. याबाबची नोंद घेणेत यावी. दि. 24/04/2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी

Scanned by CamScanner

करून पात्र उमेदवारांची यादी दि. 27/04/2018 रोजी तहसिलदार धुळे यांचे कार्यालयात नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच सदर जाहिरनामा प्रसिध्द करणेपूर्वी तहसिल कार्यालय, धुळे व या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र.पीकेए/1051/ल-6 दि.7/05/1959 प्रमाणे कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबत अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील. तसेच कोतवाल पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.

१. उमेदवाराचे वय दि.1/04/2018 रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 40 वर्षापेक्षा अधिक नसावे.
२. अर्जदार ज्या सजेसाठी अर्ज करीत आहे, त्या सजेतील अंतर्भूत असणा-या गावामधील रहिवासी असणे आवश्यक आहे.
३. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता इयत्ता 4 थी पास असणे आवश्यक आहे.
४. अर्जदार हा कोतवाल पदाची कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असला पाहिजे.
५. मागास वर्गीय उमेदवाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत सादर करावी.
६. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्ह्यात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. याबाबत अर्जदाराने दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह हमीपत्र लिहून देणे बंधनकारक आहे.
७. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दि.28/02/1974 नुसार कोतवाल म्हणून नेमणूक करताना इतर सर्व गोष्ट बरोबर असतील तर कोतवालांच्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल.
८. अर्जदार उमेदवारास वर नमुद केलेल्या पात्रतेसह लेखी व तोंडी परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करावी लागेल.
९. उमेदवारांचे लेखी व तोंडी परीक्षेचे गुण एकत्रित बेरीज करून गुणानुक्रमे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.
१०. एका सजेसाठी सर्वोत्तम गुण मिळविलेल्या प्रथम तीन उमेदवारांना तोंडी परीक्षेसाठी पवेश दिला जाईल.
११. कोतवाल म्हणुन विशिष्ट व्यक्तीस नेमणूक करण्याचे बंधन राहणार नाही. हा हक्क सर्वस्वी उपविभागीय अधिकारी, धुळे भाग धुळे यांचेकडे राखुन ठेवणेत आलेला आहे.
१२. महिलाकरीता 30 टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील असे प्रमाणपत्र अर्जसमवेत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.
१३. उमेदवारांना लेखी व तोंडी परिक्षेला उपस्थित राहण्यासाठी प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.
१४. उमेदवार अनुसुचित जाती/जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवारा व्यतिरिक्त प्रवर्गातील असल्यास अशा उमेदवारांना प्रगत उन्नत गटात मोडत नसले बाबत सक्षम अधिकाऱ्याने (नॉन क्रिमीलेअर) 31 मार्च 2018 पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
१५. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.
१६. परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.27जुन 2008 मधील नमुद निकषावर क्रम लावला जाईल.
१७. अर्ज पुर्ण माहितीसह व अचूक भरावा, त्यात नमूद करणेत आलेली सर्व माहिती खरी असणे बंधनकारक आहे.
१८. प्रक्रिया शुल्क:- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

| प्रवर्ग | खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी | मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रु.500/-<br>(रु. पाचशे मात्र/-) | रु.250/-<br>(रु.दोनशे पन्नास मात्र/-) |

उक्त परिक्षा शुल्क अर्ज सादर करतेवेळी रोखीने भरण्यात यावी. सदर रक्कम ही नापरतावा असेल.

१९. कोतवाल पदासाठी होणारी परीक्षा ही व वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.

२०. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 मधील 4 मधील तरतुदी नुसार कुटूंबात दि.28/03/2005नंतर जन्मलेले दोन पेक्षा जास्त अपत्य नाहीत याबाबतचा नमुना-अ मधील घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

२१. विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय धुळे, सेतु कार्यालय व तालुक्यातील महा ई सेवा केंद्र येथे रुपये 10/- शुल्क भरुन उपलब्ध होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येतील)

२२. ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवारांची लेखी परीक्षा 75 गुणांची लेखी परिक्षा घेण्यांत येईल व लेखी परिक्षेत पात्र ठरलेले उमेदवारांची 25 गुणांची तोंडी परिक्षा घेण्यांत येईल. सदर परिक्षा यासोबत जोडलेल्या कार्यक्रमा प्रमाणे होतील.

**अर्जदाराने त्यांचे अर्जासमवेत खाली नमुद केलेप्रमाणे कागदपत्रे जोडून सादर करणे आवश्यक आहे.**

१. शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याच्या सत्य प्रती सादर करणे आवश्यक आहे.

२. वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म तारखेच्या दाखल्याची प्रत.

३. अर्ज केलेल्या गावांच्या स्थानिक रहिवाशी असलेबाबत तलाठी किंवा मंडळ अधिकारी यांचेकडील रहिवासी दाखला.

४. कोतवालाची कर्तव्ये बजावणेस शारिरीकदृष्ट्या सक्षम असलेबाबत शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचा मुळ दाखला.

५. उमेदवार यांना कोणत्याही गुन्ह्यामध्ये दंड अगर शिक्षा झाली नसलेबाबत आणि वर्तणूक चांगली असलेबाबत अर्जदाराने स्वत: विहीत नमुन्यात स्वाक्षरीसह हमीपत्र लिहून देणे.

६. जात संवर्गाबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.

७. प्रगत उन्नत गटात मोडत नसले बाबत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गत केलेले (नॉन क्रिमिलिअर) 31 मार्च 2018 पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल असे प्रमाणपत्र अर्जासमवेत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

८. उमेदवारांचा अलीकडील काळात काढणेत आलेला पासपोर्ट आकाराचा रंगीत छायाचित्रच्या दोन प्रतींपैकी १ प्रत अर्जावर योग्य ठिकाणी लावण्यात यावी.

९. महिलांकरीत 30 टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्या बाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

१०. परिक्षा शुल्क भरले बाबत पावती.

११. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (प्रपत्र-अ) मध्ये सादर करावे.

१२. उमेदवार कोतवालाचा वारस असल्यास तलाठी यांचेकडील दाखला.

Scanned by CamScanner

उपरोक्त बाबींचा अंतर्भाव असलेला परिपूर्ण अर्ज पात्र उमेदवारांनी विहित मुदतीमध्ये व विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांपैकी छाननीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच केवळ परीक्षा घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

**कोतवाल भरती कार्यक्रम खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| 1. | जाहिरनामा प्रसिध्द करणे | 10/04/2018 |
| 2. | जाहिरनामा प्रसिध्दीनुसार कार्यालयीन वेळेत अर्ज स्विकारणे (सुटीचे दिवस वगळता) | 10/04/2018 ते 24/04/2018 |
| 3. | अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र अर्जाची यादी प्रसिध्द करणे | 27/04/2018 |
| ४. | पात्र अर्जदार यांनी प्रवेशपत्र कार्यालयातुन प्राप्त करणे(कार्यालयीन वेळेत) | 09/05/2018 ते 12/05/2018 |
| 5. | लेखी परिक्षा घेणे व लेखी परिक्षेचा निकाल घोषीत करणे | 15/05/2018 |
| 6. | लेखी परिक्षेतील पात्र उमेदवारांचे मुलाखत घेणे व निवड यादी प्रसिध्द करणे. | 16/05/2018 |
| 7. | नियुक्ती आदेश निर्गमीत करणे. | 17/05/2018 |

विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालयात कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटी वगळुन) स्विकारण्यांत येतील.

(गणेश मिसाळ)
अध्यक्ष निवड समिती
तथा
उपविभागीय अधिकारी,
धुळे भाग धुळे

उपविभागीय अधिकारी,
धुळे भाग धुळे यांचे कार्यालय
क्र.कावि/आस्था-८३६/२०१८.
धुळे, दि.०७/४/२०१८

प्रत:- मा.जिल्हाधिकारी सो. धुळे (कुळकायदा शाखा) यांचेकडे मान्यतेस्तव सविनय सादर.
प्रत:- तहसिलदार धुळे यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती धुळे यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- ब.पा. तलाठी, ------------------------ ता.धुळे जि.धुळे.

२/- उपरोक्त जाहिरनामा आपले अधिनस्त गावी तलाठी चावडीचे नोटस बोर्डावर डकवून व दवंडीत देऊन प्रसिध्द करावी. तसेच दवंडी रजिस्टरवर किमान ५० स्थानिक ग्रामस्थांच्या स्वाक्ष-या घेवून दवंडी रजिस्टरचे उता-यासह अहवाल २ दिवसात इकडील कार्यालयास सादर करावा.

(गणेश मिसाळ)
अध्यक्ष निवड समिती
तथा
उपविभागीय अधिकारी,
धुळे भाग धुळे

Scanned by CamScanner